ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

# राष्ट्र विकासासाठी महिलांचे सबलीकरण एक काळाची गरज

*** प्रेरणा अरुण श्रीनाथ,**

* संशोधक विद्यार्थी, शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा.

**गोषवारा:**

***महिला सबलीकरण हे देशाच्या वृद्धीचे लक्षण आहे. कारण कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या साधनसामग्रीचे अतिशय मोलाचे सहकार्य लाभते ते म्हणजे त्या देशातील मनुष्यबळ जर देशातील महिला सुशिक्षित आणि वैचारिक पातळीने उंच असतील तर उद्याची भावी पिढी देखील त्याच प्रकारची असेल, म्हणून महिला सबलीकरण हे देशाच्या आर्थिक विकासाचे द्योतक आहे.***

***प्रत्येक राष्ट्राच्या सर्वांगीण विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे महिला आहेत तरीही महिला आजही उपेक्षित जीवन जगत आहेत. भारतीय महिला विकासाच्या प्रक्रियेपासून खूप दूर असल्याचे दिसून येतात भारतीय राज्यघटनेने महिलांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा दिलेला आहे, असे असले तरीही आजही भारतीय महिला सामाजिक आर्थिक शैक्षणिक व राजकीय यासारख्या सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत मागास असल्याची दिसून येते. त्याचप्रमाणे महिलांच्या संख्येतील होणारी घट ही गंभीर बाब असून महिला सबलीकरणातील तो एक अडथळा आहे. तसेच आजही भारतात बऱ्याच महिला निरक्षर आहे. हे स्त्री विकासातील मागासलेपण आहे. कायद्याने हा प्रश्न सुटणार नाही कायद्याच्या दंडुक्यापेक्षा समाजमनाची मानसिकता बदलणे, मन वळविणे, ध्येयधोरण राबविण्यासाठी व्यापक प्रबोधन करण्याची गरज आहे ती आपली प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण सर्वांनीच महिलांना पाठबळ देऊन, त्याचा विकास व्हावा यासाठी हातभार लावून देशाच्या प्रगतीसाठी महिला सबल' 'सक्षम' झाल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न करावेत तरच राष्ट्राचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल.***

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तावना:**

कृषीप्रधान भारत देशात ग्रामीण भागात महिला या शेतीत आणि शेतीशी संबंधित पूरक व्यवसायाशी निगडित आहेत. संयुक्त कुटुंबपद्धती आणि पुरुषप्रधान संस्कृतीमुळे

ग्रामीण क्षेत्रात अजूनही लिंगभेद कायम आहे. भारतीय ग्रामीण समाजात स्त्री-पुरुष विषमता आहे. ती पूर्णपणे दूर झाल्याशिवाय आणि स्त्रीला तिच्या आर्थिक स्वातंत्र्याचा, तिच्या निर्णय क्षमतेनुसार लाभ मिळाल्याशिवाय स्त्री सबलीकरण झाले असे म्हणता येणार नाही. बदलत्या आधुनिक युगात यंत्र, तंत्र, विज्ञानाच्या युगात नवनवीन आव्हाने पेरण्याचे सामर्थ्य ग्रामीण स्त्रीमध्ये निर्माण व्हावे, ग्रामीण स्त्रीला लिंगभेद विरहित समाजात खरे स्थान प्राप्त झाले तरच ती सक्षम झाली असे म्हणता येईल. स्त्री सबलीकरण प्रक्रिया म्हणजे तिचं स्वयंनिर्भर होणे होय. तिच आत्मनिर्भरता आधुनिक काळात ग्रामीण महिलेला मिळवून देणे गरजेचे आहे. आजच्या युगात स्त्रियांनी अंतराळात झेप घेतली असली, स्त्री सैन्यात पोहोचली असेल देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाली तरी ग्रामीण क्षेत्रातील स्त्री ही आपल्या कौटुंबिक चौकटीतच बंदिस्त आहे. 15 ऑक्टोबर 2016 ला 'महिला किसान दिवस' भारतात जाहीर झाला. शेतकरी महिलांच्या हक्क आणि अधिकारावर काम करत असलेल्या 'किसान अधिकार मंचाने महिलाच्या श्रमाची दखल शासन दरबारी घ्यावयास लावल्याने हा दिवस साजरा करण्यात आला. ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाकडे लक्ष देणे अधिक गरजेचे आहे. त्यामुळे "राष्ट्र विकासासाठी महिलांचे सबलीकरण एक काळाची गरज" या विषयावर सखोल संशोधन करण्याच्या हेतूनेच हा शोध निबंध आहे. राष्ट्र विकासासाठी महिलांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे.

**उद्दिष्टे:**

1) महिलांचे ग्रामीण उद्योगातील स्थान अभ्यासणे.
2) महिलांचा शिक्षणातील सहभाग अभ्यासणे.
3) महिलांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती अभ्यासणे.
4) महिलांच्या सबलीकरणासाठी सरकारचे धोरण अभ्यासणे.
5) सन 2023-24 मधील अर्थसंकल्पातील महिलांसाठी शासनाचे धोरण अभ्यासणे.

**महिला सबलीकरण म्हणजे काय?**

माणव समूहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांना हतोत्साहित करणारे वर्तन करून त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारची हिनहत्वाची, अपमानाची वागणूक स्त्री जातीला मिळत आली आहे. आजही ग्रामीण भागात बऱ्याच अंशी हे चित्र कायम आहे. त्यामुळे "स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती व त्यांचे सुचालन करणे आणि लैंगिक समतेद्वारा समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळागलेला दृष्टिकोन, केलेली कृती याचा समन्वय म्हणजे स्त्री सब सबलीकरण होय." याचबरोबर दुसऱ्या शब्दात "महिलांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांना रोजगार, शिक्षण आणि आर्थिक प्रगतीसाठी समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे महिला सबलीकरण होय." महिला सबलीकरण बाबत बऱ्याच विद्वानांनी आपली मते

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

मांडलेली आहेत. "कायदे आणि कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासाची संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री- पुरुष असमानता नष्ट करणे हीच महिला सबलीकरणाची प्रक्रिया मानता येईल."

मात्र महिलांचे सबलीकरण करतांना पुरुषांना हिनविणे किंवा त्यांच्यापेक्षा महिलांचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे नव्हे तर महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, क्षमता, परंपरा यांच्यासह समानतेने वागविले जावे एवढेच अपेक्षित आहे. त्याचे वास्तविक हक्क त्यांना मिळायला हवे. मानव हा निसर्गतःच स्वतंत्र आहे. त्यांना जगण्याचा जर अधिकार आहे तर त्याचे हक्क त्याला मिळायला पाहिजे. मात्र महिला सक्षमीकरणाचा जेवढा लाभ शहरी स्त्रियांना मिळाला तेवढा ग्रामीण स्त्रियांना मिळाल्याचे दिसत नाही याला सुविधांचा अभाव. ग्रामीण भागातील लोकांची पारंपारिक मानसिकता, ग्रामीण क्षेत्रात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, ग्रामीण क्षेत्रातील सामाजिक रचना, अपुऱ्या सोयी सुविधा यासारखी अनेक कारणे कारणीभूत ठरली तरी ग्रामीण क्षेत्रातील महिलांच्या सक्षमीकरणाशिवाय संपूर्ण देशाचा विकास झाला म्हणता येत नाही.

भारताची सध्याची लोकसंख्या 1 अब्ज 38 करोड आहे व भारत हा कृषिप्रधान देश असून भारतात 6,41,000 गावे आहेत आणि एकूण लोकसंख्येच्या 62.2 लोकसंख्या ग्रामीण भागात आहे तर स्त्री पुरुष प्रमाण 1000 ला 940 असे आहे. संपूर्ण भारताच्या अन्नधान्याचा प्रश्न या ग्रामीण जनतेवर अवलंबून आहे. ग्रामीण भागात दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्यांची संख्या 22 कोटी 22 लाख आहे. दारिद्र्याची झळ सर्वाधिक कुणाला पोहोचत असेल तर ग्रामीण स्त्रीला. ग्रामीण भागातील स्त्री आई, बहिण, पत्नी, मुलगी या सगळ्या भूमिका यशस्वीरित्या पार पाडत असली तरी पुरुषप्रधान समाज रचनेमुळे आजही ती पुरुषांवर अवलंबून आहे. तिला निर्णय घेण्याचे फारसे अधिकार नाही. त्यामुळे तीचे स्थान नगण्यच आहे. प्राचीन ऋग्वेदकाळ हा भारतीय स्त्रीच्या दृष्टीने सुवर्णकाळ जरी मानल्या गेला तरी मध्ययुगात आणि पुढे पेशवेकाळात तिचे आयुष्य उंबरठ्याच्या आतच बंदिस्त झाले होते. सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नी विवाह, विधवा विवाह समस्या, नियोग प्रथा, स्त्रियांची खरेदी विक्री, देवदासी प्रथा, बाला-जरठ विवाह, केशवपन अशा अनेक रूढी प्रथा परंपरा ती एवढी जखडल्या गेली की होती की तीला आपले स्वतःचे अस्तित्व आहे हेच विसरावे लागले होते. जन्माला येणाऱ्या मानव जातीला जे हक्क आणि अधिकार आहे ते आपल्यालाही आहे हे तिला नाकारावयास भाग पाडले होते. पुढे इंग्रजांचे भारतात आगमन झाले जे स्त्रियांसाठी वरदान ठरले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानात तिला तिचे मूलभूत अधिकार बहाल करण्यात आले. तरी बऱ्याच क्षेत्रात स्त्री विषयी असलेल्या मानसिकतेत फारसा बदल झाला नाही.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

भारतातील स्त्रीचा दर्जा परंपरागत आहे. चूल आणि मूल हे तिचे कार्यक्षेत्र ठरलेले आहे. आजही शेती आणि शेतीपूरक व्यवसायातून मिळणाऱ्या रोजंदारीवर अवलंबून आहे. याशिवाय घरकाम, स्वच्छता, स्वयंपाक करणे, पाणी भरणे, घरातील निघत्याची कामे, वडीलधाऱ्यांची काळजी घेणे, मुलांचे संगोपन, कुकुटपालन, दुग्ध व्यवसाय, पाळीव जनावरांची व्यवस्था, ही नित्याची कामे तिला करावी लागतात. यात ना तीच्या श्रमाची दखल, ना श्रमाचा मोबदला. शेती, घराच्या मालकी हक्कावरही तिचे नाव नसायचे. घराच्या जबाबदाऱ्या सांभाळूनही शेतीची कामे करणाऱ्या स्त्रीला ना धड शिक्षण मिळते, ना धड पैसा मिळतो.

अनेक रूढी, प्रथा परंपरा या भारतीय समाजात आजही समाविष्ट आहे. कमी प्रमाणात स्त्रिया शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडतात. घरच्यांची संमती मिळणे पण कठीण असते. रूढीवादी विचारसरणीमुळे स्त्रियांमध्येही एक न्यूनगंड निर्माण झाला आहे. पुरुषाच्या तुलनेत त्या स्वतःला कमी लेखतात. त्यामुळे आधुनिक काळात सामाजिक, आर्थिक बदलाला त्या सामोरे जात नाही. अशातच कामाच्या ठिकाणी होणारा लिंगभाव, त्यातून होणारा हिंसात्मक शोषण करणाऱ्या घटना, समाजाविषयी मनात असलेली अनामिक भीती, स्वतःच्या सुरक्षेचा प्रश्न या सर्वाचा सामना करण्याची निडरता आजही स्त्रीमध्ये आलेली नाही. ग्रामीण क्षेत्रात स्त्रियांच्या शिक्षणाचे अल्पप्रमाण, मुलींना सुनांना शिकविण्याची नसलेली मानसिकता यामुळे स्त्री शिक्षण क्षेत्रात पुढे जाऊ शकत नाही. उच्च शिक्षण क्षेत्रात ग्रामीण मुलीचे बऱ्याच प्रमाण बऱ्याच प्रमाण बरेच कमी आहे. विवाहानंतर ग्रामीण मुलींना आपले संपूर्ण आयुष्य संसाराचा गाडा ओढण्यातच घालवावे लागते. शिक्षित कुटुंब असेल आणि सोयी सुविधा उपलब्ध असतील तरच मुलींना पुढे आपले करिअर करण्याची संधी मिळते.

**महिलांचे आर्थिक सामाजिक सबलीकरण व शासकीय योजना:**

बहुतांश स्त्रिया पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्याची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचली पाहिजे. ती अजूनही 100 टक्के सक्षम आहे ते आपण मान्य करू शकत नाही.

- महिला बचत गटांना त्याच्या छोट्या उद्योगासाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात बचत मॉल उभारले पाहिजेत.
- स्त्रियांचे आणि मुलीचे साक्षरतेचे प्रमाण वाढताना स्त्रीविषयक धोरणे आणि कायदे अधिक कडक झाले.शासकीय निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत 30 टक्के आरक्षण मिळाले. स्थानिक स्वराज्यसंस्था 50% आरक्षण मिळाले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

राज्यग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना व्यावसायिक प्रशिक्षण संधी उपलब्ध झाल्या.कायदेशीर मदतीसाठी राज्य महिला आयोग स्थापन झाला. स्व-उत्पन्नातील 10 टक्के निधी स्त्री आणिबालकल्याण्यासाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली.

- शासनानेजिल्हापरिषदांनीत्याच्यास्वउत्पन्नाच्या10 टक्के निधीतून राबवावयाच्या योजनेची निश्चिती करून दिली आहे. उपलब्ध वित्तीय तरतूद आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन महिला व बालकल्याण समिती या योजनेची निश्चिती करते. शासनाने या योजना दोन गटात विभागलेल्या आहेत.पहिल्या गटात प्रशिक्षण आणि सक्षमीकरणाच्या योजना आहेत तर दुसऱ्या गटात विविध वस्तू खरे योजना आहेत.

8 मार्च ते 5 जून 2021 या कालावधीसाठी राज्यात ग्रामीण पातळीवर 'महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान' राबविण्यात येत आहे. 23 फेब्रुवारी 2021 रोजी शासन निर्णय काढून राज्य शासनाने मान्यता दिली आहे. पूर्वीच्या ज्या कार्यान्वित योजना आहेत. उदा. निराधार महिलांसाठी शासनाची आधार योजना, बालिका समृद्ध योजना, महिला बचत गट योजना, इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना, महिलांसाठी व्यावसायिक योजना, देवदासी पुनर्वसन योजना यांना अधिक क्रियाशील केल्या जात आहे. या योजना स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या योजना आहेत. बऱ्याच योजना शेती, आर्थिक विकास, आरोग्य या गोष्टीशी संबंधित आहे.

भारतीय महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला व बालविकास मंत्रालय आणि भारत सरकारद्वारे बऱ्याच योजना राबविल्या जातात. यामागे एक उद्देश एकच आशा दडलेली असते की एक दिवस भारतीय समाजातील महिलांना पुरुषाच्या बरोबरीने संधीचा लाभ मिळेल. बलात्कार व हुंडा पिडीत महिलांकरिता मनोधैर्य योजना, सिंगल विंडो सिस्टीम, माझी कन्या भाग्यश्री योजना, बेटी बचाओं बेटी पढाव योजना, बालसंगोपन योजना, काम करणाऱ्या महिलांच्या मुलांकरिता राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, किशोरवयीन मुलींसाठी योजना, निराश्रीत महिलांसाठी आधारगृहे, शुभमंगल सामूहिक योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण असो वा शहरी महिलांना वेगवेगळ्या वयापरत्वे. गरजानुरूप सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुली व स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर करण्यासाठी व्यावसायिक व तांत्रिकप्रशिक्षण, केटरिंग, ब्युटीपार्लर, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, अन्नप्रक्रिया व्यवसायाचे प्रशिक्षण, संगणक दुरुस्ती, मोटार ड्रायव्हिंग, परिचारिका प्रशिक्षण, शिवणकाम, विणकाम प्रशिक्षण, हस्तकौशल्य प्रशिक्षण, विमा एजंट, ज्वेलरी मेकिंग, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, रोपवाटिका प्रशिक्षण, स्वसंरक्षण शारीरिक विकास प्रशिक्षण, उदा. जुडो कराटे, योग महिलांसाठी घरकुल योजना, जिजाऊ वस्तीगृह योजना, महिला हेल्पलाइन योजना, उज्वला

योजना, पंचायती राज योजनांमध्ये महिलांना संरक्षण अशा अनेक योजनांचा लाभ ग्रामीण महिलाही घेत आहे. स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून त्या अर्थाजनाकडे वळून इतर महिलांना आपल्या गटात सहभागी करून त्यांनाही आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. स्वयंसहायता बचत गट आणि इतर योजनाच्या माध्यमातून स्त्रिया 'चूल आणि मूल' यातून बाहेर पडू पाहत आहे. शासकीय योजना आणि स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून स्त्रिया पोल्ट्रीफार्म, वस्तीगृह शिवणक्लास, काजू फॅक्टरी, शेळीपालन उद्योग, गावातील पाणीपुरवठा प्रश्नांची सोडवणूक, सामूहिक दुग्ध व्यवसाय, सॅनिटरी नॅपकिन उद्योग, सायकल, स्कुटी स्टँड चालविणे, अंगणवाडी आहार पुरविणे, आयुर्वेदिक औषध बनविणे, साठविण्याचे पदार्थ, वाळवणे बनविणे, तयार वस्त्र व साड्या, अगरबत्ती, बांबूच्या शोभिवंत वस्तू बनविणे, विक्रीस ठेवणे, या सेवा पुरवत आहे. ट्रक, ट्रेन चालविण्यापर्यंत स्त्रियांची मजल गेली आहे.

- समुपदेशन केंद्राद्वारे कौटुंबिक छळाने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्ट्या खचलेल्या स्त्रियांसाठी मानसशास्त्रीय कायदेशीर समुपदेशनाचे कार्य या योजनेतून केले जाते.
- संगणक प्रशिक्षण योजनेतून महाराष्ट्र ज्ञान महामंडळास मंजुरी दिलेल्या प्रशिक्षण केंद्रात 7 वी ते 12 वीं उत्तीर्ण मुलींना एम. एस. सी. आय. टी. सी. सी.सी. तसेच या समकक्ष स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाते. तालुकास्तरावरील मुलींसाठी वसतिगृहे योजनेतून स्वयंसेवी संस्थांमार्फत दिले जाते.
- भारतीय समाजामध्ये स्त्री-समस्यांना इतरही आयाम आहेत. वेगवेगळ्या वर्गातील जाती-जमाती मधीलप्रदेशामधील स्त्री समस्याचे स्वरूप वेगवेगळे आहे. शहरी स्त्रियांच्या समस्या, ग्रामीण व शेतमजूरअसणाऱ्या स्त्रियांच्या समस्या भटक्या व आदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्या वेगवेगळ्यास्वरूपाच्या आहेत.
- शहरी भागातील महिलांसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविली जाते.कामधेनू योजनेद्वारे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात म्हणून अशा महिलांना 50 टक्के काम देण्याचा राज्य सरकारचे धोरण आहे.
- महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून दर्जेदार, नेटके आणि चोख व्यवहार करून व्यवसाय उद्योगात यशस्वी व्हावे. महिलांना आर्थिक सहकायासाठी बँका त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहतील. व्यवसाय आणि उद्योग हाच महिलांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्याचा प्रभावी मार्ग आहे. आजच्या घडीला सर्वच क्षेत्रात महिलांचे योगदान वाढले आहे. महिलांच्या प्रगतीत समाजाने सहकार्य रूपी हातभार लावल्यास त्यांना मोठी झेप घेता येईल.

देशाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प सादर केला. या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

अर्थसंकल्पात कृषी शिक्षण, आरोग्य, जलशक्ती या क्षेत्रासाठी काही महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या. त्याचप्रमाणे महिलांसाठीही काही महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या त्यामुळे महिला सबलीकरण हा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे. या देशातील बहुसंख्य महिला आजही आर्थिक दृष्ट्या परावलंबी आहे. आज देशातील प्रत्येक क्षेत्रातील महिलांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. मुद्रा योजनेअंतर्गत महिला उद्योजकाला एक लाख रुपयाचे कर्ज देण्याचे ठरवण्यात आले. तसेच बचत गटामध्ये लघुउद्योगांमध्ये काम करणाऱ्या महिलांची दखल घेण्यात आली आहे. महिला बचतगटामध्ये, गृहउद्योगांमध्ये काम करणाऱ्या महिलाचे जनधन खाते असल्यास त्या खात्याला 5000 रुपयाची ओव्हरड्राफ्ट सुविधा मिळणार आहे. या सुविधांतर्गत 5000 रुपये लवकर जनधन खात्यात जमा होणार आहे. ज्याप्रमाणे पक्षाला पंखाशिवाय उडता येत नाही. त्याचप्रमाणे महिलांच्या सहभागाशिवाय देश पुढे जाणार नाही. तेव्हा महिलांचे आर्थिक विकासातील योगदान वाढावे लागेल. यासाठी सरकार प्रयत्नशील आहे असे मत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले. सध्याचा काळ हा संक्रमणाचा आहे. रोज घडणाऱ्या सामाजिक आर्थिक बदलाचा आहे. पारंपारिक कल्पनासमजूतींना छेद दिला जात असतानाच समाजानेही त्या गतीने नवनवीन बदल स्वीकारणे गरजेचे आहे. स्थानिकप्रशासन पंचायतराज यात लोकांचे प्रतिनिधित्व करताना त्या पदाचे महत्त्व पदामार्फत केल्या जाणाऱ्या कार्याची माहिती, आपले स्थान याचे सर्वांगीण ज्ञान स्त्रियांना मिळणे गरजेचे आहे. पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच, सदस्य जिल्हा परिषद सदस्य राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर आपले स्थान पतीला देणे आपले अधिकार वापरू देणे आणि पुरुषसत्ताक पद्धतीला प्रोत्साहन देणे चुकीचे ठरते.

प्रत्येक स्त्री खरेच आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे का? कोणत्या मार्गाने ती अर्थार्जन करते आहे, ती यशस्वी ठरले आहे का? यासाठी सर्वेक्षण व्हायला पाहिजे. प्रशिक्षण शिबिरे, कायद्याबाबत जाणीव होण्यासाठी मार्गदर्शन वर्ग, आरोग्यविषयक, संरक्षण विषयक प्रशिक्षण मिळायला हवे. त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. आजच्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रत्येक स्त्री संगणकाच्या माध्यमातून जगाशी संवाद साधू लागली. ती आत्मनिर्भरहोऊन व्यवहार करू लागली. आधुनिक पूर्वकाळातील स्त्रियांचे खरे सक्षमीकरण ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही त्यांच्या जीवनामध्ये स्त्रियांच्या प्रगतीला विकासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले. त्यांच्याच शब्दात 'एखाद्या समाजाची, देशाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील महिलांची प्रगती किती झाली हे मी मोजतो डॉ. बाबासाहेबांना ही स्त्री सक्षम व्हावी असे वाटत होते. महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने मदत करत असते.

महाराष्ट्र राज्य सरकारने अलीकडेच सन 2023-24 च्या

अर्थसंकल्पात महिलांसाठी खालील घोषणा केल्या.

1) महिलांना आता मासिक 25,000 रुपये उत्पन्न व्यवसाय करमुक्त यापूर्वी ही मर्यादा मासिक 10,000 रुपये होती.
2) एस. टी. प्रवासात सर्व महिलांना 50 टक्के सूट.
3) अंगणवाडी सेविकांना 1500 रुपये वेतनवाढ
4) महिला केंद्रित पर्यटन धोरण तयार करण्यास मान्यता.
5) महाराष्ट्रात नोकरदार महिलांसाठी नवी 50 वसतिगृहे निर्माण करण्याची घोषणा.
6) लेक लाडकी योजनेची घोषणा(मुलगी सज्ञान झाल्यावर 75 हजार रुपये राज्य सरकार देणार.)

**संदर्भ :**

1) अहिरे प्रतिमा (2012) 'समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने, औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन
2) कवी स्वाती (2010), 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा', औरंगाबाद: प्रतिमा प्रकाशन.
3) गोटे शुभांगी (2013), 'स्त्री परिवर्तनाची आव्हाने', पुणे: व्हीनस प्रकाशन.
4) टिळक कमलाबाई (2011), 'स्त्री जीवनाची नवी क्षितिजे पुणे : जगन्नाथ प्रकाशन
5) नेहेते स्मिता (2011) 'भारतीय स्त्री आणि मानवाधिकार', नागपूर: साईनाथ प्रकाशन.
6) वैरागडे उज्वल व मुळे विदुन्नता (2012) 'सामुदायिक विकास व महिला सबलीकरण', औरंगाबाद : विद्या पब्लिकेशन.
7) सावरकर दामोदर (2012) 'प्राचीन अर्वाचीन महिला' कोल्हापूर: रिया पब्लिकेशन.
8) दैनिक सकाळ शासनाच्या साथीने महिला सक्षमीकरण'
9) अर्थसंकल्प सन 2023-24

*Cite This Article:*

** प्रेरणा अरुण श्रीनाथ, (2023).* राष्ट्र विकासासाठी महिलांचे सबलीकरण एक काळाची गरज, ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– II**, March –April 2023, 276-283.*